**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - संतोष गोविंद जामसंडेकर
वय - ५८ वर्षे
व्यवसाय - शेती व पोलीस पाटील
रा/ने - तिरवडे ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. २६/१२/२०२४ रोजी पोलीसांनी मला कोठेही बोलविले नव्हते. माझया समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आलेला नाही. माझया समक्ष पोलीसांनी कोणत्याही वस्तु जप्त् केल्या नव्हत्या. मला दि. २६/१२/२०२४ रोजीचे जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही.

***<u>साक्षीदार हा त्याच्या पुर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>***

२. हे म्हणणे खरे नाहीकी, दि. २६/१२/२०२४ रोजी पोलीसांनी मला गुरामवाडी येथे पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन त्या ठिकाणी पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, रविकांत परुळेकर यांच्या दुकान गाळयाच्या समोरील रस्त्यावर डाव्याबाजूला पान टपरीच्या शेजारी एक इसम दुसऱ्या इसमाच्या सांगण्यावरुन कागदावर काहीतरी लिखाण करत असताना दिसून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझया समक्ष ते लिखाणाची तपासणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, कागदावर मुंबई मटक्याची आकडेवारी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष त्या व्यक्तीचे नाव विचारले असता योगेश सत्यवान परब असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष त्या इसमाच्या ताब्यातून एक आयताकृती छापील नंबरअसलेले मध्यभागी मुंबई असे लिहिलेले पावती पुस्तक, एक कार्बन पेपर, एक निळया

शाईचे पेन व रोख रक्कम रु. २०८०/- मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा वाचून सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्याने कोणताही कागद न वाचता सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्यामध्ये तडजोडीची भाषा झालीअसल्याने त्याला शिक्षा होवू नये म्हणून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती टी.पी.चिंदरकर-कुबल यांचेमार्फत**

आरोपीतर्फे उलट तपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
दि. ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - प्रकाश गणपतराव मोरे
वय - ५७ वर्षे
व्यवसाय - पोहेकॉ १३५
रा/ने - मालवण पोलीस स्टेशन ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. २६/१२/२०२४ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे होती. सदर दिवशी विश्वसनिय बातमी मिळाली की, गाव मौजे गुरामवाड येथे एक इसम लोकांकडून पैसे स्वीकारुन जुगार खेळ खेळवत आहे. सदरची माहिती आम्ही पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री.कोल्हे यांना सांगितली. त्यांनी सदर ठिकाणी आम्हाला छापा टाकण्यास

सांगितले. त्यावर मी पंच गुरुप्रसाद बाळकृष्ण नाईक व संतोष गोविंद जामसंडेकर यांना बोलावून घेवून छाप्याची माहिती समजावून सांगितली. त्यानंतर आम्ही पोलीस व पंच असे खाजगी वाहनाने गुरामवाडी येथे गेलो. तेथे रविकांत परुळेकर यांचे दुकान गाळयासमोरील रस्त्याच्या डाव्या बाजूस पान टपारीच्या शेजारी एक इसम हातामधील कागदावर दुसऱ्या इसमाच्या सांगण्यावरुन काही तरी लिखाण करत असल्याचे दिसून आला. आम्हाला त्याचा संशय आल्याने आम्ही त्या ठिकाणी जात असताना लिखाण करत असलेल्या इसमा समोरील दुसरा इसम आमची चाहूल लागताच पळून गेला. घटनास्थळी जो इसम मिळून आला त्याच्या हातातील कागदाची पाहणी केली असता त्यावरती मुंबई मटका नावाचे आयताकृती पुस्तक त्यावर कार्बनव्दारे आकडेमोड केलेली दिसत होती. सदर पुस्तकाच्या डाव्या बाजूला पीना मारलेल्या दिसत होत्या. मध्यभागी मुंबई असे लिहिलेले होते. तसेच निळया रंगाचे बॉलपेन, ५००/- रुपयाच्या तीन नोटा, २००/- रुपयाच्या दोन नोटा, ५०/- रुपयाच्या दोन नोटा, २०/- रुपयाच्या दोन नोटा, १०/- रुपयाच्या चार नोटा असे एकूण २०८०/- रुपये त्याच्या ताब्यात मिळून आले. म्हणून सदर इसमाचे नाव गाव विचारले असता याने त्याचे नाव योगेश सत्यवान पवार वय ३३ वर्षे रा. साळेल नांगरभाट ता. मालवण असे सांगितले. सदर आरोपी याचे ताब्यात मिळून आलेल्या मुद्देमाल जप्त करुन त्यावर पंचाच्या सहयाचे लेबल लावून व माझे समक्ष सही घेवून सदर मुद्देमाल ताब्यात घेतला. मला दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी२/पीडब्ल्यू३** दिली आहे. सदर कामी पोकॉ एस.जी.चिपकर यांनी फिर्याद दाखल केली. मी मुद्देमाल जप्त् केल्यानंतर मुद्देमाल पावती फाडली. मला दाखविण्यात आलेली मुद्देमाल पावती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.त्यावर माझी व पोलीस स्टेशनचा शिक्का आहे.त्यास **नि.क्र. पी३/पीडब्ल्यू३** देण्यात येते. आरोपीला ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली.आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळूनआल्याने त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती टी.पी.चिंदरकर-कुबल यांचेमार्फत</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, पेट्रोलिंगला जात असताना ज्या वाहनाने पेट्रोलिंग करीता गेलो त्या वाहनाचा क्रमांक डयुटी रजिष्टरमध्ये नमूद करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलिंगला जात असताना त्याबाबतची नोंद डयुटी रजिष्टरला करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, मी दोषारोपपत्रा सोबत डयुटी रजिष्टरची प्रत हजर केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या आजूबाजूला दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील पंच संतोष जामसंडेकर हा पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटील हे आमचे कनिष्ठ कर्मचारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटील यांना मानधन आमच्या विभागाकडून दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळावर स्थानिक व स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध झाला असता. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचे तपास टिप्पण नोंदविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या व्यक्तीने कोण्त्या अंकावर किती पैसे लावले हे माझया तपासात निष्पन्न झालेले नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/१२/२०२४ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे होती. सदर दिवशी विश्वसनिय बातमी मिळाली की, गाव मौजे गुरामवाड येथे एक इसम लोकांकडून पैसे स्वीकारुन जुगार खेळ खेळवत आहे, सदरची माहिती आम्ही पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री.कोल्हे यांना सांगितली, त्यांनी सदर ठिकाणी आम्हाला छापा टाकण्यास सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर मी पंच गुरुप्रसाद बाळकृष्ण नाईक व संतोष गोविंद जामसंडेकर यांना बोलावून घेवून छाप्याची माहिती समजावून सांगितली, त्यानंतर आम्ही पोलीस व पंच असे खाजगी वाहनाने गुरामवाडी येथे गेलो, तेथे रविकांत परुळेकर यांचे दुकान गाळयासमोरील रस्त्याच्या डाव्या बाजूस पान टपारीच्या शेजारी एक इसम हातामधील कागदावर दुसऱ्या इसमाच्या सांगण्यावरुन काही तरी लिखाण करत असल्याचे दिसून आला, आम्हाला त्याचा संशय आल्याने आम्ही त्या ठिकाणी जात असताना लिखाण करत असलेल्या इसमा समोरील दुसरा इसम आमची चाहूल लागताच पळून गेला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी जो इसम मिळून आला त्याच्या हातातील कागदाची पाहणी केली असता त्यावरती मुंबई मटका नावाचे आयताकृती पुस्तक

त्यावर कार्बनव्दारे आकडेमोड केलेली दिसत होती, सदर पुस्तकाच्या डाव्या बाजूला पीना मारलेल्या दिसत होत्या, मध्यभागी मुंबई असे लिहिलेले होते, तसेच निळया रंगाचे बॉलपेन, ५००/- रुपयाच्या तीन नोटा, २००/- रुपयाच्या दोन नोटा, ५०/- रुपयाच्या दोन नोटा, २०/- रुपयाच्या दोन नोटा, १०/- रुपयाच्या चार नोटा असे एकूण २०८०/- रुपये त्याच्या ताब्यात मिळून आले, म्हणून सदर इसमाचे नाव गाव विचारले असता याने त्याचे नाव योगेश सत्यवान पवार वय ३३ वर्षे रा. साळेल नांगरभाट ता. मालवण असे सांगितले, सदर आरोपी याचे ताब्यात मिळून आलेल्या मुद्देमाल जप्त करुन त्यावर पंचाच्या सहयाचे लेबल लावून व माझे समक्ष नि.क्र.पी२/पीडब्ल्यू३ च्या जप्ती पंचनाम्याने जप्त् केला व नि.क्र.पी३/पीडब्ल्यू३ मुद्देमाल पावतीने जमा केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा पोलीस कर्मचारी असल्याने त्याला मदत करण्यासाठी मी खोटे तपासकाम करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.